नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 04/02/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मुरलीधर मंदीर जवळ येथे दिनांक 01/02/2021 वा. चे 11.00 वा. ते दिनांक 03/02/2021 चे 09.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अफरोज जहा अताउर रहमान फारूख वय 39 वर्ष, रा. मुरलीधर मंदीर मोठया मज्जीद जवळ सावनेर या त्यांच्या घराचे दाराला कुलुप लावुन नागपूरला गेल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराच्या दाराचा कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 18,000/–रु., नगदी 1,500/–रू व इतर घरगुती वस्तु असा एकुण कि. 33,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा बोरकर 9823581297 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 19 कि.मी अंतरावर सातनवरी येथे दिनांक 01/02/2021 चे 18.00 वा. दरम्यान आरोपी नामे– मेघा कुमरे, रा. सातनवरी, ता. जि. नागपुर हि फिर्यादी नामे– ग.भा मिराबाई अशोक गोडगे, वय 50 वर्ष, रा. सातनवरी ता.जि. नागपुर यांच्या घरा जवळ येवून फिर्यादीच्या नातवाला "मी जमा केलेल्या काडया कशा काय नेल्या" असे म्हणुन काडया नेत असता फिर्यादी हिने आरोपीला हटकले. या कारणावरून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून तिथली काडी घेवून फिर्यादीच्या उजव्या हातावर मारून जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीला पाहून घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा संदीप बेले 8888822902 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. उमरेड :– दि. 03/02/2021 चे 18:00 वा. चे सुमारास फिर्यादी यांची साडे तीन वर्षाची मुलगी/पिडीत हि आरोपी नामे– केवलराम केळझरकर, रा. कावरापेठ याच्या घराचे अंगणात खेळत असतांना आरोपी हा अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे करतांना फिर्यादीस दिसुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ)(ब) भादंवि. सहकलम 8, 12 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि शितल खोब्रागडे 8308082094 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर